# आदिवासी उपयोजना सन २००८-०९ यशोगाथा

मी श्री.त्रिंबक नायकु भांगरे रा.एकदरा, ता.अकोले येथील लाभार्थी असुन मला आदिवासी उपयोजनेअंतर्गत शेतीचे विकासासाठी विविध योजना अनुदानावर उपलब्ध आहेत याची माहिती ग्रामसेवक यांचेकडुन समजली.त्यानुसार मी कागदपत्रांची पुर्तता करून माझे प्रकरण पंचायत समिती कृषि विभागाकडे पाठविले.

पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांनी निवडलेल्या लाभार्थींची सभा बोलावुन त्यात या योजनेत कोणत्या बाबीसाठी अनुदान आहे व तुम्हास कोणत्या गोष्टीची गरज आहे याची विचारणा केली असता मी नवीन विहीर या बाबीची निवड केली व तसा प्रस्ताव त्यांचेकडे सादर केला.

पंचायत समितीकडुन मला नवीन विहीर या बाबीसाठी रूपये ६०,०००/- मंजुर झाल्याचे कळविण्यात आले.त्यानुसार मी नवीन विहीरीचे खोदकाम सुरू केले.संपुर्ण खोदकाम व बांधकाम पुर्ण केले ,त्यासाठी मला दोन टप्प्यात अनुदान मिळाले.

सदर विहीरीचे काम झाल्याने व त्या विहीरीस पाणी लागल्याने मी माझे शेतात टोमॅटो,वाल यासारखी नगदी पिके घेतली असुन त्यापासुन मला चांगले उत्पन्न मिळण्याची आशा आहे.तसेच पावसाने ओढ दिल्याने मी त्या पाण्याचा उपयोग भात,टोमॅटो या पिकांसाठी केला असुन माझे भात व टोमॅटो पिकांचे उत्पन्नात निश्चित वाढ होणार आहे.

या योजनेमुळे माझे जीवनात चैतन्य निर्माण झाले असुन माझे सारखाच इतर शेतक-यांनी लाभ घ्यावा असे वाटते.

